# 'कर्मविपाक'

जन्म, मरण, पुनर्जन्म यावर विश्वास बसणाऱ्या घटना एकामागून एक घडतांना दिसत होत्या. बालपण, तारुण्य अवस्था पार पडून वार्धक्याकडे वाटचाल करणाऱ्या प्रमिलेला आजकाल आपल्याच जीवनाचं अवलोकन करावसं वाटत असे.

वरवर पाहता त्याचे जीवन अगदी सुखात व्यतीत झाले आहे, होत आहे असंच दिसतं. अगदी तिलाही तसंच वाटत होतं. पण मग आजकाल ही अशी मनाला कातर करणारी हुरहुर का जाणवते?? नुकत्याच दोन मोठ्या घटना तिच्या आयुष्यात घडल्या होत्या. अर्थात तेव्हा त्यात ती पुरती गुरफटली होती. निवांतपणे विचार करायला वेळच मिळाला नव्हता.

पण आता सगळं शांत झालं होतं. सगळ्यांच्या दिनचर्या व्यवस्थित सुरू झाल्या होत्या. त्यामुळे प्रमिलेला स्वतःबद्दल विचार करायला बराच वेळ मिळू लागला. कुठून बरं आठवायला सुरुवात करायची?? असं मनाशी म्हणत ती अंगणातल्या पायरीवर बसून पूर्वस्मृतींना जागे करू लागली.

एका सुखवस्तू घरात प्रमिलेचा जन्म झाला होता. आई-बाबा, दादा-ताई आणि ती असं छानसं सुखी समाधानी कुटुंब होतं तिचं!! प्रमिला म्हणजे तर घरातील सगळ्यांच्या आवडीचं 'शेंडेफळ' होतं. त्या स्नेहवर्षावात चिंब भिजत असतानाच शालेय शिक्षण कधी संपले ते कळलेच नाही. मग कॉलेजशिक्षण सुरू झाले. नवीन मित्रमैत्रिणी, सहल, गॅदरिंग, स्पर्धा, परिक्षा असा व्याप वाढू लागला. आणि विशेष म्हणजे मनापासून आवडही लागली. दादाला बँकेत नोकरी लागली. ताईचं पण लग्न झालं. तिचे सासर [illegible] नाही लांबच. दादाचे पण सोज्वळ वहिनी सोबत शुभमंगल झाले. सोज्वळ वहिनी स्वभावाने खरंच छान होती. जणुकाही जीवाभावाची मैत्रिणच!! आई बाबा अधूनमधून नातेवाईकांकडे, कधी देवदर्शनाला म्हणून जायचे. एकदा असेच प्रसन्न उल्हासाने अष्टविनायकाच्या यात्रेला

2

गेले असतांना त्यांची ओळख 'महाजन' कुटुंबाशी झाली. त्यांना त्यांच्या मुलाचे - 'प्रथमेशचे' लग्न करायचे होते. असे कळताच बाबांनी आमची मुलगी प्रमिला पण लग्नाची आहे, फायनल परीक्षा झाली की बघणारच होतो आम्ही तिच्यासाठी स्थळं !! बघूया श्रीगणेश कृपेने आपला योग जुळतो कां असे म्हणून परत आल्यावर पुढील हालचाली म्हणजे दोन्ही कुटुंबांनी मुलगा-मुलगी बघण्याचा कार्यक्रम - होकार - बैठका मग साखरपुडा - लग्न थाटामाटाने पार पडलं.

प्रमिलाच्या जीवनातील नवे पर्व सुरू झाले. नवीन वातावरण; सासर माहेरचे कोडकौतुक यात प्रमिला रमून गेली. त्यांच्या संसारवेलीवर हर्षद आणि शुभ्रा अशी दोन सुंदर फुले हसु डोलू लागली. सुख म्हणजे नक्की काय असतं याचा पुरेपुर अर्थ तिला उमगु लागला होता. हर्षद - शुभ्राच्या मागे मागे करण्यात त्यांना पंख कधी फुटले हे ही कळले नाही. हर्षद इंजिनिअर होवून बंगलोरला नोकरी करु लागला. शुभ्रा इतकी गोड होती की; ती बी.फ. करत असतांनाच तिला लग्नासाठी 'परांजपेकडची' मागणी आली. त्यांचा मुलगा स्वानंद अमेरीकेत नोकरी करायचा. शुभ्राची परीक्षा झाली; स्वानंद पण लग्नासाठी म्हणून सुट्टी घेवून कोल्हापुरला आला आणि लग्न करुन शुभ्रासह अमेरीकेस गेला सुद्धा !!

घरात आता प्रमिलाचे सासु-सासरे थकले होते. त्यांची योग्य ती काळजी; डॉक्टरकडचे चेक अप इ. कामे प्रमिला व्यवस्थीत करायची. परंतू कोरोनाच्या भयंकर साथीने काळाने त्या दोघांनाही हिरावून नेलं. प्रथमेशने मग नोकरीतून V.R.S घेतल्यामुळे घरात पुन्हा ती दोघंच राहु लागली. हर्षद दिवाळीत आवर्जून यायचा. नेहमी येणे त्याला जमत नव्हते. शुभ्राशी व्हिडीओ कॉलवरच संभाषण व्हायचे; त्यातच दोघेही समाधान मानायचे. प्रमिलाने स्वतःला महिला मंडळात गुंतवून घेतलं होतं. अधून-मधून माहेरी पण जाणं व्हायचं.

classmate
Date
Page 3

दुर्वेद असाच एकदा घरी आला असतांना त्याने त्याच्या ऑफीसमधील कलीग 'सारा' बद्दल सांगितले. ती त्याला लाईफ पार्टनर म्हणून योग्य वाटली. प्रथमेश - प्रमिलाने मग तुझ्या आनंदातच आमचा आनंद आहे, असे म्हणून दुर्वेद सोबत बंगलोरला गेले. साराला भेटले. त्यांनापण ती छान वाटली. मग तिच्या आईवडीलांना भेटून लग्न - रीसेप्शन करुनच परत आले.

प्रमिला प्रथमेशने आता गृहस्थाश्रमाचा टप्पा ओलांडला होता. आपापला छंद जोपासत आयुष्याच्या या नवीन वळणावरुन त्यांचा प्रवास सुरु झाला होता. असं सगळ सुरळीत चालल होतं. पण सुखाच्या सावलीत असणाऱ्या प्रमिलाला अचानक दुःखाची झळ सोसावी लागली.

प्रथमेश एकदा फिरुन बाहेरुन फिरुन आले. कसतरी होतं - सांगता येत नाही म्हणाले. खाण्यापिण्याची पण इच्छा नव्हती. डॉ. कडे गेल्यावर माइल्ड हार्ट अटॅक येवून गेल्याचे कळले. झालं. दोघांचेही धाबे दणाणले. योग्य ती काळजी घेवून दोघेही एकमेकांना जपु लागले. प्रथमेश अधूनमधून प्रमिलाला पैसे कुठे कुठे गुंतवले आहे याबद्दल माहीती देवू लागला. तुला सगळ माहीती असाव असं म्हणू लागला. गोळ्या घेण्याचा त्याला खूपच त्रास व्हायचा - कंटाळून न घेता घेतली असं तो प्रमिलेला सांगु लागला; तशातच त्याला पॅरॅलीसीसचा अटॅक आला. दवाखाना - घर सगळ प्रमिलेलाच बघाव लागायच. दुर्वेद येवून जावून असायचा - शुभ्रा तिच्या सासरी एवढी गुरफटली होती की ती पण दोनदाच भेटून गेली.

त्यातल्या त्यात एवढ बर होतं की प्रथमेश - प्रमिलाने जिव्हाळ्याच्या मैत्रीची नाती घट्ट गुंफून ठेवली होती. सगळी मंडळी सतत येत जात होती. बेडरीडन झालेल्या प्रथमेशसाठी काय करु म्हणजे त्याला बर वाटेल असा प्रमिला सतत विचार करायची. कधी कधी तर जीवन स्तब्ध झाल्यासारखं वाटायचं - मनात नाना विचारांचे थैमान चालु असायचे - सगळ - सगळ आहे -

घरदार आहे, पण भक्कम आधार देणारा साथीदारच परावलंबी झाल्याने काय करावे सुचत नव्हते !! सारा-हर्षदने ती 'आजी' होणार असल्याची गोड बातमी दिली. तिला खूप आनंद झाला. खरंतर बेंगलोरला जाऊन साराचे डोहाळे पुरवावे असे तिला वाटे. पण मग प्रथमेश तिच्या नजरेसमोर यायचे. त्यांना एक क्षणही ती एकटी सोडू शकत नव्हती. साराच्या आईबाबांनी तिची मनःस्थिती लक्षात घेऊन तुम्ही साराची अजिबात काळजी करू नका; आम्ही तिच्याकडे व्यवस्थित लक्ष देऊ. तुम्ही बाबांची काळजी घ्या; अशी समजूत घालून धीर दिला.

फक्त वाट पाहणे तिच्या हातात होते. एक एक दिवस ती मोजून काढत होती. प्रथमेशची घरीच हॉस्पिटल-सारखी सोय केली होती. दोन शिफ्टमध्ये केअरटेकरही होते. कधीतरी रात्री झोपेत त्यांच्या काळजीने तिचा थरकाप होत होता. हर्षद बाबांना भेटायला आला असतांना आता पुढच्या महिन्यात पहिल्याच आठवड्यात साराची डेट असल्यामुळे मला यायला कसं जमेल ते सांगता येत नाही म्हणाला..

श्रावण संपत आला होता, घरोघरी, सोसायटीत श्री बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरू झाली होती. विचारांची मरगळ दूर सारून ती पण क्लबहाऊस मधील मिटींगला जाऊ लागली; वेळ जास्त होतो आहे असे लक्षात येताच तशीच मध्ये उठून येऊ लागली; पण सगळ्यांना कारण माहीत असल्यामुळे तुमच जमेल तसं येत जा असे म्हणायचे. त्या दिवशी हरतालिका होती. प्रथमेशची तब्येत एकदमच खालावली. डॉक्टरांना लगेचच घरी बोलावलं त्यांनी सगळी परिस्थिती पाहिली आणि स्पष्ट सांगितलं की आता ॲडमिट करूनही कांही फायदा होणार नाही; हर्षदला लवकर बोलावून घ्या. तिकडे सारा ॲडमिट होती; हर्षदला कसं सांगणार लवकर इकडे निघून ये म्हणून !! मन घट्ट करून तिने फोनवर सगळं सांगितलं; हर्षद म्हणाला, फ्लाईटने पोहचतोय; डॉक्टर प्रयत्नांची शर्थ करीत होते; शेवटी ईश्वरीच्छा बलीयसी ठरली आणि एका

इणी प्रथमेशची प्राणज्योत मालवली. हर्षदने धरून पाऊन ठेवले व ठेवले तोच बंगलोरहून साराच्या बाबांचा फोन आला की, 'साराला मुलगा झाला'. म्हणजे साधारणत: एकाच वेळी या जन्म - मरणाच्या दोन घटना घडल्या. काय म्हणावे नियतीला ??

काळ 'हेच सर्व दुःखावरील उपाय असतो असे म्हणतात हे अगदी खरं आहे. वडीलांचे सगळे क्रीयाकर्म करून हर्षद प्रमिलेला घेवून बंगलोरला आला. प्रमिलेच्या एका डोळ्यात आसु तर दुसऱ्या डोळ्यात हसु होतं. साराचे आई-बाबा खुप चांगले होते, ते प्रमिलाची योग्य ती काळजी घेऊ लागले. हर्षदची ऑफीसची वेळ दुपारी १ ते रात्री १२ पर्यंतची !! साराला पण विश्रांतीची गरज होती, बाळाचे सगळे वेळेवर करतांना साराच्या आईची धावपळ होत होती. हे सगळं बघून प्रमिलाने आपले दुःख बाजुला सारुन होता होईल तेवढी मदत त्यांना करु लागली.

सगळे म्हणु लागले की, आजोबाच बाळाच्या रुपाने पुन्हा जन्माला आले, आजोबांच्या गालावर जशी खळी पडायची तशीच बाळाच्या गालावर पण पडत होती, पण खरचं असं असेल कां ? यावर विश्वास कसा ठेवायचा ?? बाळाच नाव तर ठेवायलाच हवं नं असं पुढाकार घेवून तिनेच सगळ्यांना सांगितलं. आणि आजोबांची आठवण म्हणून बाळाचं नांव 'प्रसाद' ठेवूया असं सुचवलं !! त्याप्रमाणे बारसंही झालं !! बघता बघता साराची सुट्टी संपली !! तिचं ऑफीस सुरु झालं, प्रमिला व्यवस्थितपणे सर्व आवरुन घेवु लागली. साराचे आई बाबा पण त्यांच्या घरी गेले. दर आठवड्याला त्यांची चक्कर असायचीच !! म्हणजे काय की, सगळ्यांच्या कामकाजाची घडी व्यवस्थितपणे बसली.

सकाळच्या कोवळ्या उन्हात पायरीवर बसून वरील सर्व प्रसंगाची चलचित्रे प्रमिलाच्या नजरेसमोर येत होते. तेवढ्यात बाळाच्या रडण्याचा आवाज आला. पटकन उठून ती आतमध्ये त्याच्या पाळण्याजवळ गेली. त्याला उचलून

कुशीत घेत 'लबाडाची झोप झाली वाटतं' आता आजी सोबत कोवळ्या कोवळ्या उन्हातं फिरायचं कां ? असं त्याच्याशी बोलत, पण हर्षदकडे बघून 'चला आजीची ड्युटी सुरु झाली' असं हसून म्हणत ती अंगणात गेली !!

हर्षदला आईकडे बघून समाधान वाटले. पुढे कोल्हापूरला शांततेत जीवन जगणारी आणि आता इथे घड्याळाच्या काट्याप्रमाणे चालणारी आई !! स्वतःला सांभाळून ती लवकर उभी राहयली याचच हर्षदला कौतुक वाटले. त्या दोघांना तो अनिमिष नेत्रांनी बघतच राहयला. साराने येऊन त्याला हलवले व म्हटले चला, लवकर आवरून घेऊ या !! तिच्या शब्दांनी तो विचारांच्या तंद्रीतून बाहेर आला. घरकुल पुन्हा हसरं खेळतं होत आहे यापेक्षा दुसरा आनंद तो काय ?? असं साराला म्हणत दोघेही घरात गेले.

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी.

